# कथा मुल्ला नासीरुद्दीनच्या

कल्पना कुलकर्णी



परी प्रकाशन

कथा मुल्ला नासीरुद्दीनच्या

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये ९०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | मुल्ला नासीरुद्दीन | ३ |
| २. | सेठचा गुप्तहेर | १३ |
| ३. | शेवटचा डाव | १५ |
| ४. | मुल्लाची मोठी स्वप्ने | १९ |
| ५. | दयाळू मुल्ला | २१ |
| ६. | मुल्लाची प्रतिज्ञा | २६ |
| ७. | जफरशी गाठभेट | २८ |
| ८. | मुल्लाचे किस्से | ३५ |
| ९. | कबाबचा सुगंध | ३७ |
| १०. | भोपळ्यांचे वजन | ४० |
| ११. | गुप्तहेराचा कट | ४५ |
| १२. | शेरास सव्वाशेर | ५० |
| १३. | धनवान माणसाच्या न्यायालयात मुल्ला | ५३ |
| १४. | मुल्लाने केली शपथेची पुनरावृत्ती | ५८ |
| १५. | विद्वान गाढव | ६१ |
| १६. | जफर बनला मूर्ख | ६४ |
| १७. | कोर्टात मुल्ला | ६७ |
| १८. | पळा रे पळा, भूकंप आला | ६९ |
| १९. | गुलजानशी परिचय | ७२ |
| २०. | चिंताक्रांत धनिक | ७३ |
| २१. | सेनापतीची घोषणा | ७५ |
| २२. | जफरचा कुटिल डाव | ७७ |
| २३. | गुलजानला पळवले | ७९ |
| २४. | मुल्लाची योजना | ८१ |
| २५. | आता पाळी मौलानाची | ८५ |
| २६. | मौलानांचा दरबारात प्रवेश | ८७ |
| २७. | खरा मुल्ला कोण ? | ९० |
| २८. | मुल्लाचा प्रभाव | ९२ |
| २९. | गुप्तहेर शिकला धडा | ९५ |
| ३०. | मुल्लाचा रहस्यभेद | ९७ |
| ३१. | महालात हा:हा कार | १०० |
| ३२. | मुल्ला प्रगट झाला | १०१ |
| ३३. | शिक्षेची अंमलबजावणी | १०२ |
| ३४. | मुल्लाची प्रतिज्ञा पूर्ण | १०४ |
| ३५. | मुल्ला अमर आहे | १०७ |
| ३६. | मुल्लाचे आणखी काही किस्से | १०९ |
| ३७. | दिवा कुणासाठी ? | १११ |
| ३८. | न्यायाची व्याख्या | ११३ |
| ३९. | मुल्लाचे शहाणपण | ११५ |
| ४०. | वाळवंटातले दरोडेखोर | ११७ |
| ४१. | होजाच्या मळ्यातील भाजी | ११९ |
| ४२. | फुशारकी आणि बढाई | १२१ |
| ४३. | मुल्लाचे प्रवचन | १२३ |
| ४४. | उसनवार | १२६ |



# मुल्ला नासीरुद्दीन

मुलांनो, तुम्ही मुल्ला नासीरुद्दीन हे नाव ऐकले असेल. त्याच्याबद्दलचे बरेच किस्से सांगितले जातात. मुल्ला नासीरुद्दीन म्हणजे दाढी असलेला अत्यंत बुद्धिमान आणि चतुर व्यक्ती म्हणून त्याची आपल्याला ओळख आहे, पण बुखाराचे लोक त्याला एक अत्यंत दयाळू देवदूत मानतात – जो प्रत्येक अडचणीत, संकटात आणि दुःखात त्यांना मदत करतो. त्याचं वैशिष्ट्य असे की तो दुष्ट, मुजोर आणि पैशाच्या अत्यंत लोभी माणसांना लुटायचा आणि ते धन गरीब आणि गरजू लोकांना वाटायचा.

गेल्या दहा वर्षांपासून मुल्ला नासीरुद्दीन बगदाद, बरशीसराय, इस्तंबूल, दमिश्क, तेहरान, अखमेज, तबरेज इ. ठिकाणी फिरत होता, पण आता त्याला आपल्या देशात परत जायचे होते. आपल्या जन्मभूमीचे दर्शन घ्यायचे होते. आपल्या लोकांना भेटायचे होते. त्यांच्याशी हितगूज करायचे होते. शक्य झालं तर त्यांना मदत करायची होती. आपला निसर्ग डोळेभरून बघायचा होता. तिथल्या नदीत डुंबायचे होते. झाडांवरच्या फळांचा आस्वाद घ्यायचा होता,

पण असं हे मातृभूमीला जाणे सोपे नव्हते. प्रवास करताना चोर–डाकूंपासून भय असे. त्यांच्यापासून बचाव करण्यासाठी म्हणून मुल्लाने एक युक्ती केली. आपल्या पाळलेल्या

गाढवाला बरोबर घेऊन तो एका व्यापाऱ्याच्या जथ्यात मिसळून गेला. जेव्हा व्यापाऱ्यांचा हा समूह बुखाऱ्याच्या हद्दीत पोहोचला तेव्हा संध्याकाळ होऊन गेली होती आणि तिथल्या सैनिकांनी शहरात प्रवेश करायचा रस्ता बंद केला होता. व्यापाऱ्यांच्यातील एका म्होरक्याने रस्ता आत्ता बंद करू नका अशी विनंतीसुद्धा केली होती, पण त्यांनी तिकडे कानाडोळा केला.

शेवटी काय करणार ! शहराच्या बाहेर एके ठिकाणी व्यापारी लोकांनी आपला मुक्काम ठोकला आणि नेहमीप्रमाणे संध्याकाळी त्यांनी नमाज पढायला सुरुवात केली. नमाज पढल्यावर जवळपास असलेल्या एका ढाब्यावर भरपेट खाल्ले, पण इकडे बिचाऱ्या मुल्ला नासीरुद्दीनकडे ढाबेवाल्याला द्यायला पुरेसे पैसे नव्हते. शहरात प्रवेश करण्यासाठी टोल नाक्यावर काही पैसे भरावे लागत. त्यासाठी मुल्लाने ते पैसे जपून ठेवले होते. त्यामुळे त्याला उपाशीच राहायला लागले. तशी त्याला जेवणाची काही काळजी नव्हती. केवळ लवकरात लवकर त्याला आपल्या जन्मभूमीमध्ये प्रवेश करायचा होता.

त्या बुखाराबद्दलचेच विचार आता त्याच्या मनात घोळत होते. म्हणजे दुसऱ्या लोकांकडूनच त्याने याबाबत ऐकले होते, पण या दहा वर्षात ते शहर बरेच बदलले असणार.

या शहरात पूर्वी जो राजा राज्य करत होता त्याला गादीवरून काढून टाकले होते आणि आता जो नवा राजा राज्य करत होता. तो अतिशय लोभी आणि दुष्ट होता. त्याच्या जुलूम जबरदस्तीमुळे लोक अगदी त्रासून गेले होते. तो निर्दयी तर होताच, पण कमालीचा आळशी होता. आपल्याच ऐशोआरामात मग्न असल्यामुळे राज्य चांगल्या रितीने चालवण्याकडे त्याचे लक्ष नव्हते. सारा कारभार त्याचे अधिकारी बघत. राजा कर्तव्यदक्ष नसल्यामुळे तेही असेच जुलमी आणि उन्मत्त बनले होते. बुखारातले बहुतांशी लोक कर्जात बुडाले होते; कारण त्यांनी लोभी आणि लबाड सावकारांकडून मोठ्या दराने व्याज घेतले होते. गरीब जनतेची पिळवणूक चालली होती. त्यामुळे एकंदर बघायला गेलं तर बुखारामध्ये केवळ श्रीमंत आणि त्यांची हाजीहाजी करणारे लोकच ऐशारामाचे जीवन जगत होते. सामान्य माणसे केवळ दु:खात भरडली जात होती.

✦

नमाजाचे स्वर कानावर पडले तेव्हा मुल्लाला सकाळी जाग आली. डोळे उघडून त्याने पाहिले तो सैनिकांनी बुखाराच्या आत जाण्याची प्रवेशद्वारे उघडून दिली होती. लोकांनी आत जाण्यासाठी रांगा लावल्या होत्या. तिथले अधिकारी टोल वसूल करण्यासाठी खिडक्या उघडून बसले होते. तर पुढे गेलं की, सामानाची तपासणी केली जात होती. ती करताना सैनिकांना जर त्यातली एखादी वस्तू आवडली तर ते खुशाल जबरदस्तीने आपल्याकडे ठेवून घेत. शिवाय टोल वसूल करायचा ते करतच. अशा प्रकारे बुखारामध्ये सर्वत्र मनमानीचे, अन्यायाचे राज्य होते.

रांग हळूहळू पुढे सरकत होती. करताकरता मुल्ला नासीरुद्दीनची पाळी आली. त्याच्या आधीच्या लोकांना कशा प्रकारच्या जुलमाला तोंड द्यावे लागते आहे ते तो बघतच होता. ते बघून त्याच्या कपाळाच्या नसा ताडताड उडायला लागल्या. क्रोधाने हातपाय कापू लागले, पण तरी त्याने स्वत:वर प्रयत्नपूर्वक ताबा ठेवला.

मुल्लाची पाळी आल्यावर तेथील एका अधिकाऱ्याने त्याला विचारले, ''तू इथे का आला आहेस ?''

''मी इराणहून आलो आहे. बुखारामधल्या माझ्या एका नातेवाईकाला मला भेटायचे आहे.'' मुल्लाने उत्तर दिले.

''अच्छा ठीक आहे, पण मग त्याला भेटण्यासाठी तुला कर भरावा लागेल.''

मुल्लाने डोक्यावरून जरा हात फिरवला. मग आजूबाजूला शोधक नजरेने बघत तो म्हणाला, ''नाही, म्हणजे त्याचे काय आहे... मला तसं त्यांना भेटायचे नाहीये, पण त्यांच्याकडे एक जरूरीचे काम निघालेय.''

''अस्सं होय !'' त्या लोभी अधिकाऱ्याने मुल्लाकडे बारकाईने पाहिले आणि किंचित उपेक्षेचे हसू हसत तो म्हणाला, ''अरे वा ! हे तर आणखीनच छान झालं. याचा अर्थ त्याला भेटायचे हे एक काम आणि त्याबरोबर एक महत्त्वाचे कामही उरकायचे हे दुसरे काम. मग आता तर तुला दुप्पट कर




द्यायला हवा. शिवाय मशिदीसाठीपण काहीतरी मदत तू द्यायला हवीस. कारण तुम्ही येत होता तेव्हा त्या क्रूर डाकूंच्या हल्ल्यापासून त्या दयाळू अल्लानेच वाचवले ना तुम्हाला!''

खरंतर त्या लोभी अधिकाऱ्याच्या खोट्या उगाचच्या उगाच वाढवून सांगितलेल्या मागण्या मुल्ला नासीरुद्दीन धुडकावून लावणार होता, पण याक्षणी त्या शहरात प्रवेश करणे त्याच्यासाठी जास्त आवश्यक होते. त्यामुळेच आपला राग आतल्याआत दाबून त्याने मुकाट्याने सगळे पैसे भरून टाकले. तरी त्या दुष्ट अधिकाऱ्यांचे तेवढ्याने समाधान झाले नाही. त्यांनी त्याच्या कपड्याचा शोध घेतला. खिसे उलटेपालटे करून पाहिले. आता एकही पैसा त्याच्याकडे उरला नाही हे पाहिल्यावर मगच त्याला पुढे जाऊ दिले.

आता मुल्ला शहरात प्रवेश करणार तोच अधिकाऱ्याच्या काहीतरी लक्षात आले आणि तो ओरडला, ''अरे, थांब थांब. तुझा एकट्याचा कर भरून कसे चालेल ? तुझ्याबरोबरचे हे गाढव ? त्याचा कर कोण भरणार ? ज्या ज्या नातेवाईकांकडे हे गाढव तुझ्याबरोबर येईल तेवढ्यासाठीचा कर तुला भरावा लागेल.''

मुल्लाचा राग आता मनात मावेनासा झाला, पण तरी गंभीरपणे तो म्हणाला, ''हं, तसं तर हे पूर्ण शहरच माझ्या गढवाच्या नातेवाईकांनी भरलेले आहे. एरव्ही एवढे मूर्ख लोक इथे भरलेहेत तरी तुमचा राजा निवांतपणे कसा राज्य करू शकतो अल्ला जाणे ! अर्थात माझ्या गाढवाचे सगेसोयरे इथे नसते तर



तुमच्या नोकऱ्या कधीच गेल्या असत्या !'' असे तुच्छ शब्द बोलून मुल्लाने आपल्या गाढवाला काठीने ढोसले आणि सरळ कुठलाही जादा कर न भरता तो शहरात घुसला. मुल्लाच्या त्या वाक्यांचा अर्थ त्या अधिकाऱ्यांच्या लक्षात येतोय न येतोय तोपर्यंत मुल्ला पार बुखाराच्या गल्लीत शिरला होता.

अधिकाऱ्याने ते लक्षात आल्याबरोबर त्याने आपल्या माणसांना त्याच्या पाठीमागे पिटाळले.

✦

बुखाराच्या त्या गल्लीबोळातून इकडेतिकडे फिरता फिरता मुल्ला एका जुन्या पडक्या घरापुढे उभा राहिला. त्या घराच्या भिंती अर्ध्याअधिक पडल्या होत्या. घराला मोठीमोठी खिंडारं पडली होती. तिथे साप, पाली, घुशी आणि उंदरं मजेत राहत होती. काही झुडपं, रानगवत यांचेही तट तिथे माजले होते. घराचे ते छिन्नविच्छिन्न स्वरूप बघून मुल्लाचा कंठ दाटून आला. डोळे पाण्याने भरून आले. कारण त्याचे बालपण याच घरात गेले होते. मोठे कुटुंब होते त्यांचे. दगड विटांनी अतिशय सुबकपणे असे ते घर बांधलेले होते. सफेद पांढऱ्या रंगाने ते सुशोभित केलेले होते.

त्या घरासमोर एक छानसा बगीचा होता. दहा वर्षांपूर्वी जेव्हा मुल्लाने हे शहर सोडले तेव्हा त्याचे कुटुंब इथेच राहत होते, पण आता त्याला काळजी वाटत होती की, ते लोक हे घर सोडून गेले कुठे आणि या घराची अवस्था कशाने अशी झाली ? तेवढ्यात त्याला काहीतरी आवाज ऐकू आला.



कोणीतरी एक वृद्ध व्यक्ती त्याच्या दिशेने येत होती. तसे मुल्लाने त्याला विचारले, ''काका, तुम्ही सांगू शकाल का हे घर कुणाचे आहे ?''

त्या वृद्ध व्यक्तीने आपल्या कमजोर नजरेने मुल्लाकडे जरा निरखून पाहिले आणि विचारले, ''बाळा, तू कोण आहेस रे? आणि हे घर कुणाचे आहे असे का विचारतोस ?''

‘‘नाही म्हणजे काका, मी असाच एक पर्यटक माणूस आहे आणि बऱ्याच वर्षांनी इथे आलो आहे. त्यामुळे सगळं कसं बदलून गेल्यासारखं वाटतं आहे.’’ मुल्लाने उत्तर दिले.

‘‘खरंय तू म्हणतोस ते. हे जुने पडके घर मुल्ला नसीरुद्दीनच्या वाडवडिलांचे आहे. कधीतरी मुल्लाचे वडील आणि काका इथे आपल्या मुलाबाळांसह राहत होते, पण इथल्या राजाने मुल्लाला हाकलून लावले होते. का तर म्हणे त्याने इथल्या लोकांना राजाविरुद्ध भडकवले होते. हं ! त्याला झाली बरीच वर्षे, पण १ – २ वर्षांपूर्वी मी असं काहीतरी ऐकले की, मुल्ला परत या शहरात आला आहे आणि गुप्तपणे राहतो आहे. जेव्हा इथल्या राजाला हे कळले तेव्हा मुल्लाचा पत्ता लागावा म्हणून त्याने त्याच्या परिवारातल्या लोकांना तुरुंगात टाकले. त्यांचा खूप छळ केला. त्यामुळेच मुल्लाच्या वडिलांचा तिथेच मृत्यू झाला आणि बाकीचे लोक हे शहर सोडून कुठेतरी दुसरीकडे निघून गेले.



आता ते कुठे आहेत हे कुणालाच माहीत नाही. आता तर अशी परिस्थिती आहे, की मुल्लाचे नाव घ्यायला सुद्धा लोक घाबरतात. शिवाय राजाचे गुप्तहेर मुल्लाच्या पाळतीवर असतातच.'' बोलण्याच्या ओघात त्या वृद्ध व्यक्तीने सारी हकीकत मुल्लाला सांगून टाकली.

पण आपल्या कुटुंबियांची झालेली वाताहात ऐकून मुल्लाचे डोळे भरून आले. अंत:करण दु:खाने पिळवटून निघाले. त्याला वाटले, केवळ आपल्यामुळेच त्यांची अशी दुर्दशा झाली. त्या वृद्ध व्यक्तीला तो म्हणाला, ''काका, काहीही अपराध नसताना आणि कुठलाही पुरावा उपलब्ध नसताना त्यांना ही शिक्षा दिली गेली असे नाही का तुम्हाला वाटत ?''

''हो रे बाळा, पण मुल्ला या शहरात आहे की नाही हे कोणाला माहीत नाही. ते रहस्य अजून तसेच राहिले आहे.'' असे म्हणून तो माणूस निघून गेला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मुल्ला दु:खाने बघत राहिला. मग आपल्या गाढवावर बसला आणि त्याला म्हणाला, ''मित्रा, केवळ तू एकटाच असा आहेस, की प्रत्येक वेळी माझ्याबरोबर राहिलास. सुख असो, दु:ख असो, ऊन – पाऊस असो की, थंडीचे दिवस असोत तू कायम माझी साथ केलीस. खरंच देवाजवळ काही मागायचे असेल तर मी एवढेच मागेन की प्रत्येक माणूस तुझ्यासारखा इमानदार आणि विश्वासू असू दे.''

त्या गाढवानेही मुल्लाचे हे सगळे बोलणे समजत असल्यासारखी आपली मान हलवली. ''चल मित्रा, आपल्याला आता सारखे चालायचे आहे. पुढे पुढे जातच राहायचे आहे. माझ्या कुटुंबियांवर झालेल्या जुलूम–जबरदस्तीचा आणि अन्यायाचा मी सूड घेणार आहे.''

✦

दुपारपर्यंत मुल्ला चालतच होता. मग एका तलावाच्या काठी येऊन तो थांबला. तिथे असलेल्या एका पसरट खडकावर तो विसावला. समोरच्या गल्लीत एक चहाचे आणि खाद्यपदार्थाचे दुकान होते. तिथे लोकांची गर्दी होतीच, पण एक कपभर चहा–ब्रेडचे दोन तुकडे खाता येतील एवढेपण पैसे मुल्लाच्या खिशात नव्हते. तेवढ्यात समोरच्या व्यक्तीकडे मुल्लाची नजर जाताच तो चमकला. मघाचाच त्याच्याकडून कर वसूल केलेला तो उर्मट अधिकारी घोड्यावर बसून इकडे येत होता. त्याच्या पुढेमागे दोनदोन नोकर चालत होते.


दुकानाशी येताच तो अधिकारी घोड्यावरून उतरला आणि सरळ दुकानाच्या आत गेला. त्याच्या नोकरांनी घोड्याला एका बाजूला बांधले. त्याच वेळी मुल्लाने दुकानाच्या आत जाऊन डोकावून पाहिले तर तो अधिकारी आतल्या कॉटवर पडून केव्हाच झोपी गेलाय. त्याच्या घोरण्याचा आवाज बाहेरपर्यंत येत होता. नोकरांनीही पाहिले की, आपला मालक गाढ झोपला आहे. म्हणून ते जरा समोरच्या झाडाखाली जाऊन सिगारेट ओढत बसले.

मुल्लाला खूप भूक लागली होती. म्हणून तो ईश्वराजवळ एवढीच प्रार्थना करत होता, की काहीतरी असं घडावं जेणेकरून एक कप चहा पिण्याएवढे पैसे त्याच्याजवळ यावेत आणि काय आश्चर्य! तेवढ्यात त्याला कोणाचातरी आवाज ऐकू आला. ''सुनो भाई.'' मुल्लाने आवाजाच्या दिशेने पाहिले तर रथात बसलेली कोणीतरी श्रीमंत व्यक्ती त्याला विचारत होती.

''अहो भाईजान, मला जरा चौकशी करायची होती. तुमच्याजवळ जो हा ऐटबाज घोडा आहे, त्याची काय किंमत असेल? मला आवडला आहे तो. म्हणून विकत घ्यावा म्हणतो.''

मुल्लाने इकडे – तिकडे पाहिले. आजूबाजूला कोणी नव्हते. तो घोडा त्या अधिकाऱ्याचाच होता आणि मुल्ला त्यावेळी त्या घोड्याजवळ उभा होता. त्यामुळे रथातल्या त्या व्यक्तीला वाटले की, तो घोडा मुल्लाचाच आहे. मुल्लाने मनातल्या मनात अल्लाला हात जोडले. जणू त्याने मुल्लाची मदत करण्यासाठीच एक देवदूत पाठवला होता, पण मग अतिशय सावधपणे मुल्ला म्हणाला, ''नाही महाशय, हा घोडा विकण्यासाठी नाहीये.''

रथामध्ये बसलेली व्यक्ती जरा नाराज झाली. तरी चिकाटीने ती म्हणाली, ''हे पाहा भल्या गृहस्था, मला तू अगदी थकलेला दिसतो आहेत. तू काही खाल्लंपिलं आहे असेही वाटत नाही. शिवाय या शानदार घोड्यावर बसून ऐटीत मिरवावे असाही तुझा पोषाख उंची नाहीये. मला तर वाटतेय की तू नक्की एखाद्या आर्थिक अडचणीत असशील. जर हा घोडा तू मला विकलास तर तुझी अडचण नक्कीच दूर होईल.''



मुल्लाने दुकानाच्या आत नजर टाकली. तो करअधिकारी अजून छान झोपला होता. मग काहीएक विचार करून मुल्ला म्हणाला, ''तुम्ही म्हणता ते खरे आहे. तुमच्यासारख्या धनाढ्य व्यक्तीजवळच हा घोडा शोभून दिसेल.''